महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2025-26/1327 दिनांक- 25/04/2025

## MBA-CAT/CMAT-CET- 2025-26 परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना सूचना

1) **परीक्षेचा वेळ व दिनांक**:-

| अ. क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1 | विद्यार्थ्यांनी चाळणी परीक्षेसाठी प्रवेश पत्र डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.06/05/2025 रोजी सांय. 06.00 पासून दि.10/05/2025 रोजी रात्री 11.00 वाजता पर्यंत (महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील नोटीस बोर्ड वरुन) |
| 2 | परीक्षेचा दिनांक | दि.11/05/2025 (03.00 pm ते 05.00 pm) |

- परीक्षेचे स्वरुप:- परीक्षा ही संगणकाच्या सहाय्याने (CBT) बहुपर्यायी पद्धतीने होईल.
- परीक्षेचा कालावधी 120 मिनीटे (दुपारी - 03.00 pm ते 05.00 pm)

2) **परीक्षेचा अभ्यासक्रम**:-

- Language Comprehension
- Intelligence and Critical reasoning
- Mathematical skill
- Data Analysis and Sufficiency
- General awareness

- परीक्षेसाठी वरील अभ्यासक्रमाचे एकूण- 100 प्रश्न असतील, प्रत्येक प्रश्नाला 2 गुण असतील असे एकूण 200 गुणांची परीक्षा असेल. कोणतेही नकारात्मक गुण असणार नाहीत.

3) **प्रशिक्षणासाठी लाभार्थ्यांची निवड खाली नमुद सामाजिक प्रवर्ग व समांतर आरक्षणानुसार करण्यात येईल**:

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | इतर मागास वर्ग (OBC) | 59% |
| 2 | निरधीसुचीत जमाती - अ (VJ-A) | 10% |
| 3 | भटक्या जमाती - ब (NT-B) | 8% |
| 4 | भटक्या जमाती - क (NT-C) | 11% |
| 5 | भटक्या जमाती - ड (NT-D) | 6% |
| 6 | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | 6% |
| | **एकूण** | **100%** |

- **प्रशिक्षणाकरीता आरक्षण**:-

1. प्रवर्गनिहाय महिलांसाठी 30% जागा राखीव आहे.
2. दिव्यांगाकरिता 4% जागा राखीव आहे.
3. अनाथांसाठी 1% जागा राखीव आहे.

**4) विद्यार्थ्यांकरीता महत्त्वाच्या सूचना**:-

1. अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
2. विद्यार्थ्यांनी त्यांचे चाळणी परीक्षेसाठी प्रवेश पत्र हे महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील नोटीस बोर्ड वरुन दि.06/05/2025 रोजी सांय. 06.00 पासून दि.10/05/2025 रोजी रात्री 11.00 वाजता पर्यंत डाऊनलोड करता येईल.
3. विद्यार्थ्यांना प्रवेश पत्रात नमुद केलेले परीक्षा केंद्र हे कुठल्याही परिस्थितीत बदलुन मिळणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
4. प्रवेश पत्रासंदर्भात येणाऱ्या अडचणी/शंका असल्यास **0712-2870120/21** या क्रमांकावर संपर्क करावा.

**5) दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना**:-

- लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) सुविधा घेण्याकरीता लक्षणीय (Banchmark) दिव्यांगत्व किमान 40% असलेल्या उमेदवाने शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील वैध दिव्यांगत्वाबाबतचे प्रमाणपत्र (Certificate of Disability) धारण करणे आवश्यक आहे.
- लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असलेल्या उमेदवाराने विहित करण्यात आलेले दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे विहित प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (Certificate regarding physical Limitation in an examination to write) धारण करणे आवश्यक आहे. परंतु खालील नमुद दिव्यांगत्व प्रकारातील उमेदवारांना सदरचे प्रमाणपत्र अनिवार्य नाही.
  - I. Blindness
  - II. Locomotor Disability- both arm affected- BA
  - III. Cerebral palsy
- परीक्षेच्या वेळी लेखनिकाची आणि/अथवा मदत घेण्याची अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) आवश्यकता असल्यास उमेदवारांनी सोबतच्या नमुन्यामध्ये (प्रपत्र-1) महाज्योती या कार्यालयाकडे दि.05/05/2025 रोजी पुर्वी विनंती अर्ज करुन लेखनिकाची आणि/अथवा मदत घेण्याची अनुग्रह कालावधीची (Compensatory Time) आवश्यकता असल्याबाबत स्पष्ट मागणी करणे. विनंती अर्ज उमेदवाराने महाज्योतीच्या खालील ई-मेल वर पाठविण्यात यावा.
  - ➢ mahajyotihelpdesk@gmail.com
- लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने परीक्षेच्या वेळी खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे:-

I. शासनाकडून कायमस्वरुपी दिव्यांगत्व किमान 40% असलेल्याबाबत दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र (Certificate of Disability)
II. दिव्यांगत्वामुळे उमेदवरार स्वत:चे उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे विहित प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (Certificate regarding physical Limitation in an examination to write) (नमुना क्र.1) तसेच Appendix- 1 सोबत जोडावे.
III. लेखनिकाचे मुळ आधार कार्ड (ओळख पडताळणीसाठी)

- परीक्षेच्या वेळी पात्र दिव्यांग उमेदवारांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी 20 मिनीटे याप्रमाणे अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.
- लेखनिक यांची शैक्षणिक पात्रता इयत्ता 10 वी किंवा उमेदवार ज्या सामाईक प्रवेश परीक्षेकरीता पात्र आहे, त्या परीक्षेच्या किमान शैक्षणिक पात्रता निकषापेक्षा जास्त नसावी.
- लेखनिकाने परीक्षेच्या वेळी आधारकार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मुळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
- लेखनिकाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराने सांगितलेले उत्तर निवडण्यास मदत करणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप/मार्गदर्शन/सूचना करु नये.
- लेखनिकाने परीक्षा प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी इतर उमेदवारांशी/लेखनिकांशी चर्चा/गप्पा करु नये.
- लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही. अथवा इतर उमेदवारांशी एकग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

वरील सर्व सूचनांचे तसेच परीक्षेच्या वेळी देण्यात येणाऱ्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. अन्यथा सूचनांचे उल्लंघन समजून विद्यार्थ्याला निवडीकरीता कायमस्वरुपी अथवा ठराविक कालावधीसाठी प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल.

## IMPORTANT INSTRUCTIONS FOR CANDIDATES THROUGH E ADMIT CARD

I. Candidates shall report the examination center at given reporting time as mentioned in E Admit Card.
II. Candidate will not be allowed to enter examination premise after gate closure time.
III. Seating arrangement is made available at the center, candidates must reach the respective Examination Hall as per their SEAT NUMBER and acquire the seat allocated.
IV. Candidate are required to compulsorily carry the original government identification proof (Driving license /Aadhar card / Pan card / voting card any of these).
V. In case of system related issues student can bring it to notice of Supervisor. They will guide you to get query or issues resolved.

VI. Candidates will be instructed by invigilator for login details. They can login into system using those credentials.

VII. Candidates are requested not to panic for time taken in resolving queries/issues. They must immediately inform the Invigilator or Supervisor regarding technical or other issues.

VIII. Candidates will carry only a SIMPLE BALL POINT PEN into the Exam Hall. Candidates will not be allowed to carry books/mobile/smart watches/Earbuds/Electronic devices /fancy pens and any other paper material or any electrical gadgets in examination hall. If any such material is found with the candidate, he/she will be barred from the Examination.

IX. No Candidate will be allowed to go out before the end time of examination.

X. Candidate has to take care of their belongings which they are carrying at examination center. No authority is responsible for the loss of belongings.

XI. Differently abled candidates will be given 20 minutes extra for examination.

XII. IF ANY CANDIDATE IS FOUND IN ANY KIND OF MALPRACTICE, or is involved in any activity that directly or indirectly disrupts/disturbs the exam conducted, or disobeys the discipline and decorum of the exam hall, HE/SHE WILL BE BARRED FROM THE EXAMINATION AND PENAL ACTION WILL BE INITIATED AGAINST THE CANDIDATE INCLUDING BLACKLISTING AND ACTION FOR CRIMINAL OFFENCE.

- **प्रशिक्षण निवड प्रक्रिया**:-
  1. MBA-CAT/CMAT-CET 2025-26 परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरीता चाळणी परीक्षा विहित वेळेत घेण्यात येईल. परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे मेरीट यादी लावण्यात येईल.
  2. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी प्रशिक्षण संस्थेद्वारे करण्यात येईल त्यात कुठल्याही प्रकारची त्रुटी आढळल्यास सदर विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करण्यात येईल.
  3. तात्पुरत्या निवड यादितील विद्यार्थी रुजु न झाल्यास प्रतिक्षा यादी जाहीर करण्यात येईल.
  4. कोणत्याही कारणाने परीक्षेचा वेळ, दिनांक बदलल्यास किंवा परीक्षा पुन्हा घ्यावी लागल्यास विद्यार्थ्याला बदलाची माहिती केवळ महाज्योतीच्या संकेतस्थळावर देण्यात येईल.
  5. परीक्षेसंदर्भात सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती, नागपूर यांचा आहे.

(स्वा.)
(प्रशांत वावगे)
**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

नमुना क्र. - 1

## लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र

| लेखनिकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो या ठिकाणी चिकटवावा |
|---|

1) सामायिक प्रवेश परीक्षेचे नाव : ______________________________

2) उमेदवाराचे नाव : ______________________________

3) प्रोफाईलमधील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल नं.) : ______________________________

4) प्रोफाईलमधील नोंदणीकृत ई-मेल आयडी : ______________________________

5) लेखनिकाचे नाव : ______________________________

6) लेखनिकाचा जन्म दिनांक : ______________________________

7) लेखनिकाचा आधार क्रमांक : ______________________________

8) लेखनिकाचा भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नं) :______________________________

9) लेखनिकाची शैक्षणिक अर्हता : ______________________________

### * प्रमाणपत्र *

आम्ही ______________________________ (उमेदवाराचे नाव) सामायिक प्रवेश परीक्षेकरीता पात्र उमेदवार व ______________________________ (लेखनिकाचे नाव) उमेदवाराचा लेखनिक, खालीलप्रमाणे प्रतिज्ञापत्र सादर करतो की,

1. उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचुक आहे. दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सूचना आम्ही वाचल्या असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत हमी देतो.
2. दिव्यांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील सूचनांनुसार उमेदवाराला लेखनिकाची आवश्यकता आहे.
3. विहित दिव्यांगत्वाबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले वैध प्रमाणपत्र उपलब्ध असून ते कोणत्याही टप्प्यावर चौकशीच्या वेळी सादर करण्यात येईल.
4. उमेदवार व लेखनिक एकाच परीक्षेकरीता उमेदवार नाहीत.
5. लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह कालावधी घेण्याबाबत विहित निकषांची उमेदवाराकडून पूर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वत:बद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवाराकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची उमेदवारी रद्द करुन उमेदवारास व लेखनिकास स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व संनियंत्रण समितीच्या सूचनांचे उल्लंघन समजून आयोजित सर्व परीक्षा व निवडीकरीता कायमस्वरुपी प्रतिरोधीत (Debar) करण्यात येईल.

**उमेदवाराची स्वाक्षरी / अंगठा** ____________________ **लेखनिकाची स्वाक्षरी** ____________________

**दिनांक** ______________ **दिनांक** ______________

## APPENDIX – I

## Certificate regarding physical limitation in an examinee to write

This is to certify that, I have examined Mr/Ms/Mrs ..........................................................(Name of the Candidate with disability), a person with .......................................................... (Nature and percentage of disability as mentioned in the certificate of disability),
S/o/D/o................................................, a resident of
..............................................................................................(Village/District/State) and to state that he/she has physical limitation which hampers his/her writing capabilities owing to his/her disability.

Signature

Chief Medical Officer/Civil Surgeon/Medical
Superintendent of a Government health care institute

Name and Designation

Name of Government Hospital/Health Care Centre with Seal

Place:-

Date:-

Note:- Certificate should be given by a specialist of the relevant stream/disability (eg. Visual impairment – Ophthalmologist, Locomotor disability – Orthopaedic specialist/PMR).

पपत्र - 1

## दिव्यांग उमेदवारांसाठी लेखनिक व / किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज

(Blindness/Locomotor disability-both arm affected-BA/Cerebral palsy या दिव्यांग प्रकारातील उमेदवारांकरिता)

प्रति,
मा.व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर

**विषय : दिव्यांग उमेदवारास परीक्षेच्या वेळी लेखनिक व /किंवा अनुग्रह कालावधी उपलब्ध करुन देण्याबाबत.**

महोदय,

मी ______________________________ (उमेदवाराचे नाव) दिव्यांग उमेदवार असून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रण समितीद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. उमेदवारीसंदर्भात माझी माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) सामायिक प्रवेश परीक्षेचे नाव ______________________________

2) प्रोफाईलमधील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्र. (मोबाईल नं.) ____________________

3) प्रोफाईलमधील नोंदणीकृत ई-मेल आयडी ______________________________

मी (Blindness/Locomotor disability-both arm affected-BA/Cerebral palsy(लागू नसेल ते खोडावे) या दिव्यांगत्व प्रकारातील उमेदवार असून परीक्षेच्या वेळी स्वत: उत्तरे लिहण्यासाठी मी सक्षम नाही. मला लेखनिकाची / लेखनिकाची व अनुग्रह कालावधीची (लागू नसेल ते खोडावे) आवश्यकता आहे. सदरच्या अर्जासोबत मी विहित दिव्यांगत्वाबाबतच्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेल्या वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी / अंगठा ______________________________

दिनांक ____________________

(टिप - उमेदवाराने खालील कागदपत्रे एकत्रित स्वरुपात pdf करुन महाज्योती संस्थेच्या ई-मेलवर पाठवावे)

1. दिव्यांग उमेदवारांसाठी लेखनिक व /किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत विनंती अर्ज (प्रपत्र-1)
2. लेखनिकाची सेवा घेणे आवश्यक असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची (Valid Certificate regarding physical limitation in an examination to write) (अनिवार्य नाही)
3. लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने लेखनिकासह द्यावयाचे संयुक्त प्रमाणपत्र (नमुना क्र.1)